नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ७२ | Issue - 72 | वार मंगळवार दि. २९ जुलै २०२५ | Blow- Tuesday Date 29 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्राची लेक ठरली बुद्धिबळाची राणी

## दिव्या देशमुखने वर्ल्ड कप जिंकून रचला इतिहास; अनुभवी आणि उच्च मानांकन असलेल्या कोनेरू हम्पीचा केला पराभव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जॉर्जिया देशातील बटुमी शहरात पार पडलेल्या महिला बुद्धिबळ वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने इतिहास रचला. तिने अनुभवी आणि उच्च मानांकन असलेल्या कोनेरू हम्पीचा पराभव करत हे प्रतिष्ठेचे विजेतेपद आपल्या नावे केले. असे विजेतेपद पटकवणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली आहे. सामन्याच्या मुख्य फेऱ्यांमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये एक रोमांचक सामना पाहायला मिळाला. दिव्याने कोणतीही चूक न करता हम्पीला ड्रॉवर रोखले आणि सामना टायब्रेकरपर्यंत नेला. टायब्रेकरमध्ये काळ्या मोहरांवर खेळताना दिव्याने अत्यंत हुशारीने आणि आत्मविश्वासाने खेळ करत निर्णायक विजय मिळवला.

सामन्यात एक क्षण असा आला होता, जिथे हम्पीकडे पुन्हा सामन्यात परतण्याची संधी होती. मात्र, ती त्या संधीचं रूपांतर विजयात करू शकली नाही. दुसरीकडे, दिव्याने कोणताही चुक न करता ऐतिहासिक कामगिरी केली आणि महिला बुद्धिबळ वर्ल्ड कप जिंकला.

जर अंतिम फेरीतील सामन्यात दोन्ही खेळाडूंचा स्कोअर बरोबरीत राहिला, तर निकाल लागण्यासाठी टायब्रेकर राउंड खेळवले जातात. या टायब्रेकरमध्ये प्रत्येक खेळाडूला १५-१५ मिनिटे दिली जातात आणि प्रत्येक चालीनंतर १० सेकंद वाढवले जातात, जर स्कोअर अजूनही बरोबरीत राहिला असता, तर पुन्हा एकदा १०-१० मिनिटांचे आणखी एक सेट खेळवले गेले असते, त्यातही प्रत्येक चालीनंतर १० सेकंद मिळाले असते. पण या सगळ्याची गरजच पडली नाही, कारण दिव्याने पहिल्याच टायब्रेकरमध्ये हम्पीला मात दिली आणि थेट विजेतेपदावर कब्जा केला.

नागपूरची १९ वर्षांची दिव्या देशमुख आता केवळ वर्ल्ड कप विजेतीच नाही, तर तिने या ऐतिहासिक विजयासोबत ग्रँडमास्टरचा मानही मिळवला आहे. या क्षणी दिव्या खूपच भावूक झाली होती.

तिच्यासाठी हे आयुष्यातलं अविस्मरणीय क्षण ठरले. विशेष म्हणजे, दिव्या आधीच 'कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरली आहे, जे बुद्धिबळ विश्वविजेतेपदाच्या वाटचालीतलं एक महत्त्वाचं पाऊल आहे.

महिला वर्ल्ड कप २०२५ जिंकणाऱ्या दिव्या देशमुखला विजेतेपदाबरोबरच सुमारे ४२ लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे. उपविजेती कोनेरू हम्पी हिला ३५,००० डॉलर्स म्हणजेच सुमारे ३० लाख रुपये मिळाले.

या दोन्ही खेळाडूंनी बुद्धिबळातील अत्यंत प्रतिष्ठेच्या कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्रता मिळवली आहे, जे विश्वविजेतेपदाच्या दिशेने एक मोठं पाऊल मानलं जातं. भारतामध्ये बुद्धिबळाचं क्रेझ वेगाने वाढत आहे, आणि त्यामुळे या दोघींनाही नवीन स्पॉन्सर्स, ब्रँड डील्स आणि व्यावसायिक संधी मिळण्याची शक्यता प्रचंड आहे.



भारताची बुद्धिबळाची दुनिया आता नवी दिशा घेत आहे, आणि दिव्या देशमुख या प्रवासाची आघाडीची खेळाडू ठरली आहे.

# विरोधकांचे वर्तन असेच राहिले तर ते पुढील २० वर्षे विरोधी बाकांवरच बसतील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संसदेत ऑपरेशन सिंदूरच्या मुद्द्यावर जोरदार घमासान रंगले आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या भाषणादरम्यान विरोधकांनी त्यांना धारेवर धरले आणि सभागृहात गोंधळ घातला, ज्यामुळे गृहमंत्री अमित शाह संतापले आणि त्यांनी विरोधकांना सुनावले आहे. अमित शाह यांनी विरोधकांना परराष्ट्र मंत्र्यांवर विश्वास नसल्याचे म्हणत फटकारले आहे. 'विरोधकांचे वर्तन असेच राहिले तर ते पुढील २० वर्षे विरोधी बाकांवरच बसतील,' असे शाह म्हणाले. यावेळी ते प्रचंड संतापले होते.

**ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेवेळी अमित शहा विरोधकांवर प्रचंड संतापले**

लोकसभेत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर या मुद्द्यावर निवेदन करताना विरोधकांना उत्तर दिले आहे. पहलगाम हल्ल्याच्या रात्री अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे डी वेंस यांनी पंतप्रधान मोदींना फोन करून या हल्ल्याचा निषेध केला आणि भारताला आत्म संरक्षणाचा पूर्ण अधिकार आहे, असे वेंस यांनी म्हटल्याचे जयशंकर यांनी स्पष्ट केले.

परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी लोकसभेत नमूद केले की, २२ एप्रिल ते १७ जून दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात कोणताही थेट संपर्क झाला नाही. पण यादरम्यान पाकिस्तानकडून मात्र फोन आल्याचे जयशंकर म्हणाले, पाकिस्तानने पुढे कोणताही हल्ला करणार नाही, असे म्हणणारे फोन कॉल्स भारताला आले. परंतु भारताने स्पष्टच सांगितले होते की, कोणतीही युद्धबंदीबाबतची गोष्ट पाकिस्तानच्या डायरेक्टर जनरल ऑफ मिलिट्री ऑपरेशन्स (ऊ्न्ल्व्ज) द्वारे औपचारिकपणे यायला हवी आहे. जयशंकर यांनी पुन्हा अधोरेखित केले की, पाकिस्तानचा खरा चेहरा जगासमोर आणला. युद्धबंदीमध्ये कोणतीही मध्यस्थी झाली नाही. त्यावेळी पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात कोणतीही चर्चा झालेली नाही. नागरिकांचे रक्षण करणे हेच आमचे कर्तव्य आहे. जयशंकर यांनी असे म्हणताच विरोधकांनी गोंधळ सुरू केला आणि प्रश्न उपस्थित केले.



विरोधी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ घालताच गृहमंत्री अमित शाह संतापून म्हणाले, 'तुम्हाला (विरोधकांना) भारत देशाचे परराष्ट्र मंत्री जे बोलत आहेत, त्यावर विश्वास नाही, तुम्हाला दुसऱ्या देशावर विश्वास आहे. तुमचं असंच वर्तन राहिलं तर तुम्ही २० वर्षे तिथेच विरोधी पक्षातच बसणार.' शाह यांनी असेही म्हटले की, 'मी त्यांच्या पक्षातील परराष्ट्र संबंधांचे महत्त्व समजू शकतो. पण याचा अर्थ असा नाही की, त्यांच्या पक्षाच्या सगळ्या गोष्टी इथे सभागृहात थोपल्या जाव्यात.' शाह पुढे म्हणाले, 'हेच कारण आहे की ते तिथे (विरोधी बाकांवर) बसले आहेत आणि पुढील २० वर्षांपर्यंत बसलेलेच राहतील.' या माध्यमातून त्यांनी अप्रत्यक्षपणे काँग्रेसवर निशाणा साधला आहे. संसदेत 'ऑपरेशन सिंदूर' वरील चर्चेदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, 'जेव्हा त्यांचे (विरोधकांचे) अध्यक्ष बोलत होते, तेव्हा आम्ही त्यांना संयमाने ऐकत होतो. मी तुम्हाला उद्या सांगेन की त्यांनी किती खोटे बोलले आहेत. आता ते सत्य ऐकू शकत नाहीत. जेव्हा इतक्या महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा होत आहे, आणि परराष्ट्र मंत्री बोलत आहेत, तर काय हे चांगले दिसते की विपक्ष त्यांना त्रास देत आहे? अध्यक्ष महोदय, आपण त्यांना समजावा, अन्यथा आम्ही पण नंतर आपल्या सदस्यांना काही समजावू शकणार नाही.' या संपूर्ण चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये खडाजंगी झाली.

# ट्रम्प यांच्याकडून मध्यस्थीचा दावा जयशंकर यांनी फेटाळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्ध थांबवल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार केला आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष द्विपक्षीय मुद्दा असताना तिसऱ्या देशाकडून करण्यात आलेली मध्यस्थी का स्वीकारली गेली, असा सवाल विरोधी पक्षाच्या खासदारांनी पावसाळी अधिवेशनात उपस्थित केला. त्या प्रश्नाला परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी उत्तर दिलं. सध्या ऑपरेशन सिंदूरवर संसदेत चर्चा सुरु आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या दाव्यावरुन विरोधी पक्षाच्या खासदारांनी केंद्र सरकारला धारेवर धरलं आहे.



पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आलं. भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष सुरु असताना, ऑपरेशन सिंदूर राबवलं जात असताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या समोर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरेंडर केलं आणि पाकिस्तानसोबत शस्त्रसंधी करण्यास तयार झाले, अशा आशयाची भाषणं विरोधी पक्षातील बहुतांश खासदारांनी केली. त्यावर परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी सरकारची बाजू मांडली. भारतानं द्विपक्षीय संघर्षात कोणत्याही तिसऱ्या देशाची मध्यस्थी स्वीकारली नसल्याचा दावा परराष्ट्र मंत्र्यांनी ठामपणे केला.

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत मार्गदर्शक सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडियाचा वापर करण्याबाबत नवे मार्गदर्शक नियम जाहीर केले असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.डिजिटल युगात सोशल मीडिया हे संवादाचे प्रभावी साधन असले तरी त्यातून गोपनीय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे, तसेच शासकीय नियमांचे उल्लंघन होवू नये याकरिता मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात आली आहेत. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ हे सोशल मीडियाच्या वापराबाबतही लागू राहतील. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना :-**

राज्य शासनातील अधिकारी-कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच प्रतिनियुक्तीने किंवा करारपद्धतीने नेमलेले कर्मचारी यांना हे नियम लागू राहणार आहेत.

शासनाच्या किंवा भारतातील कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर प्रतिकूल टीका करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडियाचा वापर जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.

वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट स्वतंत्र ठेवावेत. केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाईट किंवा ॲपचा वापर करू नये. शासकीय योजना व उपक्रमांच्या प्रसारासाठी केवळ अधिकृत आणि प्राधिकृत माध्यमांचा वापर करावा. कार्यालयीन कामकाजाच्या समन्वयासाठी व्हॉट्सअॅप, टेलिग्रामसारख्या मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल.

शासकीय योजनांच्या यशस्वितेसंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करता येईल; मात्र त्यातून स्वयंप्रशंसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैयक्तिक अकाऊंटवर शासकीय पदनाम, लोगो, गणवेश, शासकीय मालमत्तेचे फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करू नयेत. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, भेदभाव करणारा मजकूर पोस्ट किंवा फॉरवर्ड करणे मनाई आहे. प्राधिकृत मंजुरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तऐवज सोशल मीडियावर अपलोड करू नयेत. बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट योग्य प्रकारे हस्तांतरित करावे. शासनाने स्पष्ट केले आहे की, या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल. डिजिटल युगात सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर व्हावा आणि शासकीय यंत्रणेचा विश्वासार्हता अबाधित राहावी, यासाठी नियमावली करण्यात आली आहेत.

**आमची कारवाई स्वसंरक्षणार्थ होती** — **संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांचे संसदभवनमध्ये संबोधन**

# 'संरक्षण दलांना मोकळीक दिली, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानमधील ९ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त, १०० हून अधिक दहशतवादी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विरोधकांनी एक आठवडा रणकंदन केल्यानंतर आज (२८ जुलै) संसदेत ऑपरेशन सिंदूरवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी माहिती दिली. 'आम्ही दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून मारले. आमच्या माता-भगिनींच्या सिंदूरचा बदला लष्कराने दहशतवाद्यांकडून घेतला' असे राजनाथ सिंह म्हणाले. त्यांनी सांगितले की, आमचे उद्दिष्ट दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करणे होते आणि सैन्याने त्यांचे ध्येय साध्य केले. आम्ही पाकिस्तानच्या दबावाखाली युद्धबंदी केली नाही. ते पुढे म्हणाले, 'ही सिंदूर की लाली ही शौर्याची कहाणी आहे. या ऑपरेशनमध्ये १०० हून अधिक दहशतवादी आणि हँडलर्स मारले गेले. आम्ही संपूर्ण ऑपरेशन २२ मिनिटांत पूर्ण केले. तत्पूर्वी, बिहार मतदार पडताळणीशी संबंधित विशेष गहन सुधारणा मुद्द्यावर विरोधकांनी गोंधळ घातला. सभागृहाचे कामकाज तीनदा तहकूब करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरवरील चर्चा दुपारी २ वाजून ५ मिनिटांनी सुरू झाली. ऑपरेशन सिंदूर हे त्रि-सेवा समन्वयाचे उत्तम उदाहरण आहे. तिन्ही दलांनी पाकिस्तानच्या कृतींना चोख प्रत्युत्तर दिले. नौदलाने उत्तर समुद्रात आपली तैनाती मजबूत केली. आम्ही दाखवून दिले की आम्ही समुद्रापासून जमिनीपर्यंत हल्ला करण्यास सक्षम आहोत. कारवाई थांबवण्यात आली कारण सर्व उद्दिष्टे साध्य झाली. राजनाथ सिंह म्हणाले की, आमची कारवाई पूर्णपणे स्वसंरक्षणार्थ होती. ती चिथावणीखोर कारवाई नव्हती. पाकिस्तानने इलेक्ट्रॉनिक युद्धाचा अवलंब केला. त्यांच्या निशाण्यावर विमानतळांसह अनेक लक्ष्य होते. भारताने हे सर्व उधळून लावले. पाकिस्तान भारताचे काहीही ताब्यात घेऊ शकला नाही. भारताने पाकिस्तानचा प्रत्येक हल्ला हाणून पाडला. आमची कारवाई पाकिस्तानच्या तुलनेत ठोस आणि प्रभावी होती. ऑपरेशन सिंदूर पार पाडण्यासाठी आम्ही अनेक गोष्टींचा विचार केला. पाकिस्तानच्या सामान्य लोकांना कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात आली. आम्ही पाकिस्तानचे ९ दहशतवादी अड्डे अचूकपणे नष्ट केले. १०० हून अधिक दहशतवादी, प्रशिक्षक, हँडलर मारले गेले. त्यांना आयएसआयचा उघड पाठिंबा होता. ६-७ मे रोजी भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरद्वारे लष्करी कारवाई केली. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये एक दहशतवादी आणि भ्याड हल्ला झाला. २६ निष्पाप लोकांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांचा धर्म विचारून त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. हे एक घृणास्पद कृत्य होते. हे भारताच्या सहनशक्तीची परीक्षा होती. पंतप्रधानांच्या बैठकीत सैन्याला निर्णायक कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.



सीमा ओलांडणे किंवा पकडणे हे उद्दिष्ट नव्हते

राजनाथ म्हणाले की, सीमा ओलांडणे किंवा पकडणे हे उद्दिष्ट नव्हते. या कारवाईचा उद्देश वर्षानुवर्षे पोसल्या जाणाऱ्या दहशतवाद्यांना लक्ष्य करणे होता. ऑपरेशन सिंदूरमध्ये, सैन्याला स्वतःच्या वस्तू निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. १० मे रोजी सकाळी भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या हवाई तळावर हल्ला केला आणि त्यांनी पराभव स्वीकारला. पाकिस्तानने म्हटले की आता पुरे झाले, हल्ले थांबवा.

पाकिस्तानचा हा प्रस्ताव या इशारासह स्वीकारण्यात आला की ऑपरेशन पुढे ढकलण्यात आलेले नाही, ते फक्त थांबवण्यात आले आहे. जर पाकिस्तानने काही सुरू केले तर ऑपरेशन पुन्हा सुरू करता येईल. १२ मे रोजी दोन्ही देशांच्या डीजीएमओंमध्ये चर्चा झाली आणि संघर्ष थांबवण्यासाठी एक करार झाला.

## संपादकीय....

### संसदमध्ये घमासान

बिहार मतदार पडताळणीशी संबंधित विशेष गहन सुधारणा मुद्द्यावर विरोधकांनी गोंधळ घातला. सभागृहाचे काम काज तीनदा तहकूब करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरवरील चर्चा दुपारी २ वाजून ५ मिनिटांनी सुरू झाली. ऑपरेशन सिंदूर हे त्रि-सेवा समन्वयाचे उत्तम उदाहरण आहे. तिन्ही दलांनी पाकिस्तानच्या कृतींना चोख प्रत्युत्तर दिले. नौदलाने उत्तर समुद्रात आपली तैनाती मजबूत केली. आम्ही दाखवून दिले की आम्ही समुद्रापासून जमिनीपर्यंत हल्ला करण्यास सक्षम आहोत. कारवाई थांबवण्यात आली कारण सर्व उद्दिष्टे साध्य झाली. विरोधकांनी एक आठवडा रणकंदन केल्यानंतर आज (२८ जुलै) संसदेत ऑपरेशन सिंदूरवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी माहिती दिली. 'आम्ही दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून मारले. आमच्या माता-भगिनींच्या सिंदूरचा बदला लष्कराने दहशतवाद्यांकडून घेतला. आमची कारवाई पूर्णपणे स्वसंरक्षणार्थ होती. ती चिथावणीखोर कारवाई नव्हती. पाकिस्तानने इलेक्ट्रॉनिक युद्धाचा अवलंब केला. त्यांच्या निशाण्यावर विमानतळांसह अनेक लक्ष्य होते. भारताने हे सर्व उधळून लावले. पाकिस्तान भारताचे काहीही ताब्यात घेऊ शकला नाही. भारताने पाकिस्तानचा प्रत्येक हल्ला हाणून पाडला. आमची कारवाई पाकिस्तानच्या तुलनेत ठोस आणि प्रभावी होती. ऑपरेशन सिंदूर पार पाडण्यासाठी आम्ही अनेक गोष्टींचा विचार केला. पाकिस्तानच्या सामान्य लोकांना कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात आली. आम्ही पाकिस्तानचे ९ दहशतवादी अड्डे अचूकपणे नष्ट केले. १०० हून अधिक दहशतवादी, प्रशिक्षक, हँडलर मारले गेले. त्यांना आयएसआयचा उघड पाठिंबा होता. दरम्यान संसदेत ऑपरेशन सिंदूरच्या मुद्द्यावर जोरदार घमासान रंगले आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या भाषणादरम्यान विरोधकांनी त्यांना धारेवर धरले आणि सभागृहात गोंधळ घातला, ज्यामुळे गृहमंत्री अमित शाह संतापले आणि त्यांनी विरोधकांना सुनावले आहे. अमित शाह यांनी विरोधकांना परराष्ट्र मंत्र्यांवर विश्वास नसल्याचे म्हणत फटकारले आहे. 'विरोधकांचे वर्तन असेच राहिले तर ते पुढील २० वर्षे विरोधी बाकांवरच बसतील,' असे शाह म्हणाले. यावेळी ते प्रचंड संतापले होते. लोकसभेत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर या मुद्द्यावर निवेदन करताना विरोधकांना उत्तर दिले आहे. पहलगाम हल्ल्याच्या रात्री अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे डी वेंस यांनी पंतप्रधान मोदींना फोन करून या हल्ल्याचा निषेध केला आणि भारताला आत्मसंरक्षणाचा पूर्ण अधिकार आहे, असे वेंस यांनी म्हटल्याचे जयशंकर यांनी स्पष्ट केले. युद्धबंदीमध्ये कोणतीही मध्यस्थी झाली नाही. त्यावेळी पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात कोणतीही चर्चा झालेली नाही. नागरिकांचे रक्षण करणे हेच आमचे कर्तव्य आहे. जयशंकर यांनी असे म्हणताच विरोधकांनी गोंधळ सुरू केला आणि प्रश्न उपस्थित केले.

# प्रसार माध्यमे अडकली टीआरपी आणि नेत्यांच्या कचाट्यात..!

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंत मुंडे ह्यांचे प्रकट चिंतन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माध्यमांच्या अस्तित्वाला आलेली अपंगिता सत्तेच्या सहवासानेचा निर्माण झाली आहे. घोडेस्वाराला आपल्याला पाय आहेत याचा विसर पडावा असा काहीसा हा प्रकार आहे. लोकमताला आकार आणि आधार देण्याचे काम भाषिक वृतपत्रेच नेहमी करीत असतात. त्यामुळे खरे तर मराठी माध्यमांवरील जबाबदारी फार मोठी आहे परंतू दुर्दैवाने आपली मीडिया 'टीआरपी ' च्या चक्रात गुरुफटून गेली आहे. सत्ताधारी पक्ष मिळालेली राजसत्ता टिकवण्यासाठी आणि विरोधी पक्ष सत्ता मिळविण्यासाठी लढत असलेल्या तत्वहीन साठमारीत मिडीयाही अडकून पडली आहे.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांच्या मागे धावण्याच्या स्पर्धेत मीडिया सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांपासून दूर गेला, असे चित्र दिसते.इतकेच नव्हे तर सरकारी पक्षाकडून पत्रकारांच्या प्रश्नावर दिशाभूल होत असतानाही मीडिया हतबलतेच्या परिघात गेला असल्याचे विदारक चित्र आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंत मुंडे केले.

दैनिकआधुनिककेसरीच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त श्री. मुंडे ह्यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी माध्यमं,विद्यमान राजकारण, राज्यकर्ते यांच्या बरोबरच सर्वसामान्य माणसाच्या संदर्भात जणू प्रकट चिंतनच केले.

संवादाला प्रारंभच मनसे सुप्रिमो राज ठाकरे ह्यांच्या ताज्या निवेदनाने झाली... अहो, राज ठाकरे आज बोलले. खरं आहे त्यांचं म्हणणे पण यापूर्वी उपमुख्यमंत्री अजितदादा, मंत्री पंकजा मुंडे यांनी सुद्धा अशाच प्रकारची खंत व्यक्त केली होती. होतं काय, माध्यमांना चोवीस तास बातम्या दाखवाव्या लागतात. काय दाखवणार! मग काही तरी खुसपट काढायचे आणि सूत्रांच्या हवाल्यावर दिवस लोटायचा... पण त्यामुळे एखाद्या नेत्याला, कार्यकर्त्याला आणि कधी कधी तर कशाचा कशाशी संबंध नसलेल्या साध्यासुध्या व्यवसाईक, शिक्षक डॉक्टर यांना देखील अपमानीत होण्याचीच नव्हे तर आयुष्यातून उठण्याची वेळ आलेली आहे. सन सनाटी आरोपांची बातमीदारी वेगाने फोफावली, आरोपांचे नंतर काय होते? मात्र विनाकारण आरोप करून एखाद्याला सार्वजनिक जीवनातून उठवण्याचा प्रयत्न माध्यमांच्या खांद्यावर बंदूक ठेवून केला जातो. त्याला अलीकडची माध्यमे मोठ्या प्रमाणात बळी पडत आहेत. सर्वच माध्यमातून राजकीय बातम्यांचे प्रमाण ९०% च्या पुढे गेल्या माध्यमात एकांगीपणा आला आहे.परिनामी सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांनाच माध्यमांचा उबग येवू लागला आहे. त्यामुळे यावर गंभीर पणे कुठेतरी एकत्रितपणे विचार करण्याची वेळ आली आहे, हे नक्की.

वसंत मुंडे म्हणजे मराठावाड्याच्या ग्रामीण पत्रकारितेचा राज्य पातळीवर उमटलेला ठसा.प्रचंड जनसंपर्क, पत्रकार संघटना, सतत भ्रमंती आणि राज्य पातळीवरील एका दैनिकाची जिल्ह्याची जबाबदारी अत्यंत यशस्वीपणे सांभाळणारे वसंतराव अद्भुत असे रसायन आहे.

वसंतराव सांगू लागले, पत्रकारितेच्या समोर ज्या अडचणी आहेत त्याबद्दल सहानुभूती बाळगून सुद्धा कुठे तरी गफलत होते आहे असे दिसते. खरं तर पत्रकारांची तळमळ, वाचकांचे समाधान आणि मालकाचा फायदा या त्रिसूत्रीवर आधारीत पत्रकारितेची स्थिती असायला हरकत नाही. पण 'टीआरपी एके टीआरपी ' करीत नसलेली सत्ता मिळविण्यासाठी आणि असलेली टिकविण्यासाठी सुरु असलेल्या तत्वहीन राजकारणाच्या आणि पुढाऱ्यांच्या बातम्या दाखविणे म्हणजे पत्रकारिता, हे जे समीकरण तयार होऊ पाहात आहे ना ते घातक आहे. समाजस्वास्थासाठीचा नव्हे तर लोकशाहीसाठी सुद्धा!

मीडियाला सर्वसामान्यांच्या प्रश्नाशी काही देणंघेणंचा नाही असे दिसते. जनता आणि राज्यकर्ते ह्यांच्यातील दुवा असे पत्रकारितेचे स्वरूप असायला पाहिजे. त्यातून लोकमन राज्यकर्त्यापर्यंत पोहचू शकते. छोटी - मोठी काम मार्गी लागू शकतात. पण त्यासाठी जनतेशी संपर्क पाहिजे. संवाद पाहिजे. त्यासाठी चांगले नेटवर्क पाहिजे. त्यापेक्षा मुंबईत बसून 'सूत्रांना कामाला ' लावले की झालं. पण यातून फारतर करमणूक होऊ शकेल. निष्पन्न काही होणार नाही.

### चिंतन करण्याची गरज

**बदलत्या राजकीय – सामाजिक बदलाच्या वातावरणाचा पत्रकारितेवर परिणाम होणे काही रॉकेट सायन्स नाही हे खरे असले तरी या बाबतीत पत्रकारितेच्या क्षेत्रातील धुरीनांनी एकत्र येऊन विचारमंथन होणे आवश्यक झाले आहे असे वाटते.**

### म्हणून संवाद यात्रा...

**माध्यमं आणि सर्वसामान्य जनतेतील संवाद कुठेतरी हरवत चालला असे प्रकर्षाने वाटले आणि त्याच चिंतनातून 'दीक्षाभूमी ते मंत्रालय ' या माझ्या संवाद यात्रेने आकार घेतला. २४ जिल्हे आणि १५० तालुक्यात ही संवाद यात्रा गेली. त्या त्या जिल्ह्यातील, तालुका.. खेड्यापाडयातील माणसं, त्यांचे प्रश्न समजवून घेता आले... स्थानिक पातळीवरील माध्यमं सक्षम झाली पाहिजे असे या यात्रेच्या निमित्ताने माझ्या निदर्शनास आले.जनता आणि मीडिया ह्यांच्यात पूल तयार करण्याचा एक महत्वाचा प्रयत्न माझ्या हातून झाला, असे वसंतराव मुंडे ह्यांनी अभिमानपूर्वक नमूद केले.**

### मौका सभी को मिलता हैं!

**पत्रकारांसमोरच्या अडचणी, त्यांचे प्रश्न राज्य शासनाने गंभीरपणे समजून घेतले पाहिजे. सन्मान योजनेतील अर्जावर वर्ष वर्ष, दोन दोन वर्ष काही निर्णयच होणार नसेल तर ती पत्रकारांची क्रूर चेष्टा आहे. एस, नो.. काहीतरी सांगून टाका ना. आशेवर कां ठेवता त्याला? सन्मान योजनेत वाढ करू असे माजी मुख्यमंत्री जाहीर करतात. विधिमंडळ पत्रकार संघाच्या पत्रकार परिषदेतही पदभार स्वीकारताच विद्यमान मुख्यमंत्री फडणवीस घोषणा करतात, अर्थमंत्री असलेले उपमुख्यमंत्री अजितदादा दुजोरा देतात. शासनाची अधिसूचना निघते आणि वर्ष लोटलं तरी अंमलबजावणी होत नसेल तर काय म्हणावे तुमच्या कारभाराला. अधिसूचना निघूनही अंमलबजावणी होत नाही असे हे पहिलेच प्रकरण असावे. लोकसभेला फटका बसल्यानंतर भराभरा मंडळ स्थापन करण्याचा सपाटा महायुतीने चालवला होता... त्यापैकीच पत्रकारांनाही महामंडळ जाहीर करण्यात आले होते त्याचे काय झाले ते अजुनही गुलदस्त्यात आहे. निवडणुका जिंकल्या आता विसरा, असा प्रकार तर नाही ना? तसे सरकारला वाटत असेल तर मौका सभी क मिलता हैं ' हे लक्षात असलेले बरे!**

### पत्रकारांचे प्रतिनिधित्व हवे

**वरिष्ठ सभागृह... विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त सदस्यांत किमान एकतरी पत्रकार प्रतिनिधी असावा अशी अपेक्षा वसंतराव मुंडे ह्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी पद्म पुरस्कार देताना, राज्यसभेवर घेताना सर्वसमावेशक आणि विविध क्षेत्रातील मान्यवराना स्थान देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्याचा बोध घेऊन मुख्यमंत्री देवेद्रजी फडणवीस ह्यांनी त्या पद्धतीने निर्णय घेतला पाहिजे. पत्रकारांना विधी मंडळात स्थान दिले पाहिजे. कुणालाही द्या... अगदी तुमच्या जवळच्या पत्रकारला द्या पण आता राज्यपाल नियुक्त ज्या ५ जागा भरायच्या आहेत, त्यात एखादा पत्रकार असू द्या, एवढी विनंती आहे.**



## जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा सेमी इंग्लिश करण्यावर भर : ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : जिल्हा परिषदेचे शाळांमधील विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण मिळावे यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांना सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर या सर्व शाळा सेमी इंग्लिश करण्यावर भर राहणार आहे, अशी ग्वाही ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

खटाव तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळा शिरसवडी येथील नव्याने बांधण्यात येणाऱ्या ७ वर्ग खोल्यांचे व पळशी येथील जिल्हा परिषद आदर्श शाळा येथील ९ खोल्यांचे भूमिपूजन मंत्री श्री. गोरे यांच्या हस्ते झाले. या भूमिपूजन प्रसंगी माजी आमदार डॉ. दिलीप येळगावकर, गटविकास अधिकारी योगेश कदम, अंकुश गोरे,गट शिक्षणाधिकारी सोनाली विभुते, अनिल माने,भरत जाधव, बंडा गोडसे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

शिरसवडी व पळशी येथील शाळेच्या नवीन खोल्यांचे बांधकाम चांगल्या पद्धतीने व वेळेवर करावे, असे सांगून मंत्री श्री. गोरे म्हणाले, जिल्हा परिषदेत शाळेतील शिक्षकांनी शाळेतील पटसंख्या वाढीसाठी प्रयत्न करावेत. शाळांना सर्व सुविधा शासनामार्फत दिल्या जातील. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चांगले शिक्षण दिले जाते याबाबत नागरिकांचा विश्वास संपादन करावा. खाजगी शाळांच्या स्पर्धेत कुठेही मागे राहू नये यासाठी सर्व शाळा आदर्श शाळा करण्यावर भर राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. माण तालुक्यातील रस्ते,वीज, पाणी, शिक्षण या बाबींवर भर देण्यात आला असून विकास कामांसाठी कुठेही निधी कमी पडू दिला जाणार नाही. गावकऱ्यांनी शाळेच्या कामकाजात योगदान दिले त्या शाळा आदर्श शाळा झाल्या आहेत व या शाळेमध्ये पटसंख्या ही वाढली आहे हे अनेक शाळांनी दाखवून दिले आहे. शिरसवडी व पळशी येथील ग्रामस्थांनी शाळेमध्ये योगदान देऊन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण कसे शिक्षण मिळेल हे पाहण्याबरोबरच शाळेला विविध माध्यमातून मदत करावी, असे असेही मंत्री श्री. गोरे यांनी सांगून विविध संस्थांमध्ये उच्च पदावर जिल्हा परिषदेतील शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यरत आहे. नागरिकांनीही आपल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश जिल्हा शाळेच्या शाळांमध्ये घ्यावा,असेही आवाहन त्यांनी केले.



## माजी आमदार संजय जगताप यांच्या सकारात्मक तोडग्याने सहाव्या दिवशी उपोषण स्थगित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर : पुरंदर हवेलीचे माजी आमदार व भाजपा नेते संजय जगताप यांच्या मध्यस्थीला यश येऊन माजी आमदार संजय जगताप यांनी काढलेल्या सकारात्मक तोडग्यामुळे भोर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयासमोर सुरु असलेले बेमुदत उपोषण अखेर सहाव्या दिवशी स्थगित करण्यात आले, माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते कालीदास उबाळे यांनी ज्युश पेऊन उपोषण स्थगित केले, भोर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या सासवड येथील कार्यालयासमोर कालीदास उबाळे हे सोमवार दि २१ जुलै पासून मौजे जेजुरी तालुका पुरंदर येथील वडीलोपार्जित शेतजमिनीचे २००९ साली सुरेश अर्जुन उबाळे यांनी वडीलाकडून परस्पर बक्षिसपत्राचा दस्त केला होता , त्यातील हिस्सा मिळावा अन्यथा संबंधितावर कारवाई व्हावी याकरिता बेमुदत उपोषण सुरु केले होते,

शनिवार दि.२६ जुलै रोजी दुपारी ३ - वाजता माजी आमदार संजय जगताप हे आंदोलन स्थळी आले त्यावेळी आपण आता आंदोलन थांबवू , आजचं चर्चा करुन, विषय मार्गस्थ करु असे आश्वासन दिल्यानंतर तात्काळ आंदोलन स्थगित करुन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या दालनात बैठक घेऊन ,कालीदास उबाळे यांस सुरेश उबाळे यांनी चाळीस लाख रुपये देण्याचे निश्चित झाले त्याबदल्यात कालीदास उबाळे यांनी न्यायालयात दाखल केलेला दाव्यात दोन्ही बाजुने येत्या तारखेला सासवड न्यायालयात तडजोड करण्याचे ठरले यासाठी माजी आमदार संजय जगताप यांनी सलग सहातास वेळ देऊन गेल्या अनेक वर्षाचा वाद मिटवून दोन भावांमध्ये दिलजमाई केल्याने, दोन्ही बाजूने त्यांचे आभार मानले यावेळी अँड. विजय भालेराव रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष डॉ सतीश केदारी, प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, प्रहार संघटनेच्या नेत्या सुरेखाताई ढवळे, रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे, संभाजी ब्रिगेड जेजुरी शहर अध्यक्ष संदीप जगताप शिवराज झगडे, रोहिणीताई कुंभारकर मनोज भिसे , मंगेश गायकवाड, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पुणे शहर अध्यक्ष किशोर पंडागळे प्रदेश सचिव सुभाष सहजराव तालुका कार्याध्यक्ष सुधीर शेलार, रिपब्लिकन पक्षाचे तालुका युवक अध्यक्ष स्वप्निल पाटोळे सचिन कांबळे, सुनिल जगताप उपसरपंच गौरव भोसले, माजी सरपंच विशाल कांबळे, शाम जगताप, निखील आढाळगे, पंढरीनाथ आढागळे सर कालीदास उबाळे व सुरेश उबाळे , यांसह दोघांचेही मित्र परिवार उपस्थित होते.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श स्मारकाच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या मिळेल : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : आजच्या प्रगत महाराष्ट्रात विकसित देशाचा पाया क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी रचला. समाजसुधारणा, महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आदर्श या पूर्णाकृती स्मारकाच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या आपण सर्वांना मिळत राहील, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

शहरातील माळीवाडा वेस येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या चौथऱ्याचे भूमि पूजन उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, अभय आगरकर, सचिन जगताप, अक्षय कर्डीले, माणिकराव विधाते, नितेश भिंगारदिवे, माजी आयुक्त पंकज जावळे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, देशाला व राज्याला अनेक महापुरुष व महान स्त्रियांनी योग्य मार्ग दाखवला. त्यांच्याच विचारांचा आदर्श घेत समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन राज्य शासन काम करत आहे. आज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. स्वातंत्र्याचा, स्वाभिमानाचा अनुभव घेत त्या आपले योगदान देत असल्याचेही ते म्हणाले.

राज्यातील महापुरुष व महान स्त्रियांची स्मारके उभारण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात येत आहे. यासाठी पावणेसातशे कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव याजन्मगावी १०० कोटी रुपये खर्च करून प्रत्येकाला अभिमान वाटेल असे भव्य स्मारक उभे केले जात आहे. जिल्ह्यातील महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे टप्प्याटप्प्याने पूर्णाकृती स्वरूपात उभारण्यात येतील, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी दिली.

असे आहे स्मारक –

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीत क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा व स्मारक उभारण्यात आले आहे. हे स्मारक स्त्री शिक्षणाचे प्रतीक म्हणून साकारण्यात आले असून, यामध्ये महात्मा फुले यांचा १० फूट उंचीचा आणि सावित्रीबाई फुले यांचा ९ फूट उंचीचा कास्य धातूपासून बनवलेला पुतळा आहे. त्याचबरोबर शाळेत जात असलेल्या ४ फूट उंचीच्या एका लहान मुलीची मूर्तीही समोर स्थापित करण्यात आली आहे. या तिन्ही शिल्पांचे एकूण वजन सुमारे १८०० किलोग्रॅम आहे.



स्मारकाच्या परिसरात भिडे वाड्यातील प्रेरणादायी पाच भित्तीचित्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये स्त्री शिक्षण, हुंडा प्रथेविरोध, सती प्रथा, सामाजिक विषमता आणि फुले वाड्यातील जीवनदृष्यांचा समावेश आहे. पुतळा निर्मितीसाठी ५० लाख ६० हजार रुपये इतका खर्च आला आहे. सुशोभीकरणासाठी ४१ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरावी : प्राचार्य उगले

## डुबेरे येथील जनता विद्यालयात विज्ञान छंद मंडळाची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी

विज्ञानातून सर्व काही शिका . प्रत्येक गोष्टी मागील कार्यकारणभाव जाणून घेऊन जिज्ञासूवृत्ती ठेवलीस आपोआपच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरावी.त्यातून संशोधक तयार होतील, असे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले यांनी केले .

डुबेरे येथील जनता विद्यालयात विज्ञान छंद मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून उगले बोलत होते.




व्यासपीठावर पर्यवेक्षक उल्हास पवार, पी.आर.करपे, सोमनाथ पगार, सोमनाथ गिरी, प्रयोगशाळा सहाय्यक सरिता कुटे, कचेश्वर शिंदे, सुनिता ढोली, सविता खंडागळे आदी उपस्थित होते. विज्ञान छंद मंडळाची स्थापना, उद्घाटन व वैज्ञानिक रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

विज्ञान छंद मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य रंगनाथ उगले , सचिव रेवणनाथ कांगणे तसेच सदस्य म्हणून विद्यालयातील सर्व विज्ञान शिक्षक व विद्यार्थी यांची निवड करण्यात आली. सायली आव्हाड हिने मनोगत व्यक्त केले. पल्लवी गवळी व दुर्वा जाधव यांनी दुध, मध, हळद, रवा व लाल तिखट मिरची पावडर आदी वस्तूतील भेसळ कशी ओळखयाची याविषयी विविध प्रयोग करून दाखवले व भेसळयुक्त पदार्थांचे आरोग्यावर होणारे परिणाम याविषयी माहिती दिली.

विज्ञान शिक्षक पी. आर. करपे यांनी विविध शास्त्रज्ञांनी लावलेले शोध, शास्त्रज्ञांना शोध लावताना येणाऱ्या अडचणी याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच करपे यांनी विज्ञानातील मूलभूत तत्वे ,संबोध समजावून घेऊन त्यांचे सामान्यीकरण करून आपल्या रोजच्या आयुष्यामध्ये ते उपयोगात आणता येते हे उदाहरणासह स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विज्ञान छंद मंडळ समितीचे प्रमुख रेवणनाथ कांगणे यांनी विज्ञान छंद मंडळ स्थापन करण्याचा हेतू व उद्देश समजावून दिला . सूत्रसंचालन विज्ञान विषय समिती प्रमुख डी.ए.रबडे यांनी केले तर आभार मोनाली ढोमसे यांनी मानले.यावेळी सर्व शिक्षक ,शिक्षिका, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

### एसआयआर प्रक्रियेविरोधात आम्ही एकजुट

# लोकशाहीची हत्या होऊ देणार नाही : इंडिया आघाडीचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**संसद भवन परिसरात निदर्शने**

नवी दिल्ली : आज रोजी एसआयआर प्रक्रिया रद्द करावी या मागणीसाठी काँग्रेसच्या सोनियाजी गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, मा. राहुलजी गांधी, खा. प्रियांका गांधी, खा. प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेस, इंडिया आघाडीच्या नेत्यांनी SIR प्रकिया रद्द करावी या मागणीसाठी निदर्शने करून SIR प्रक्रियेविरोधात आम्ही एकजुट झालो असून लोकशाहीची हत्या होऊ देणार नाही असा निर्धार INDIA आघाडीच्या नेत्यांनी व्यक्त केला.

संसदेत इंडिया आघाडी जनतेच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सातत्याने आवाज उठवत राहणार आहे. संपूर्ण देशभर SIR प्रक्रिया लागू करून दुर्बल आणि वंचित घटकांचा मतदानाचा हक्क कटकारस्थान रचून हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. हा प्रकार कदापिही खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा इंडिया आघाडीने दिला आहे.

इंडिया आघाडीने स्पष्ट केले की लोकशाही आणि संविधानावर आरएसएस-बीजेपी ची मनुवादी मानसिकता हावी होऊ देणार नाही. जनता आणि घटनेच्या रक्षणासाठी हा लढा संसदेत आणि रस्त्यावरही तीव्र करण्यात येईल.




# पालखेड विद्यालयात गुणवंतांना पन्नास हजारांची बक्षीसे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तालुक्यातील पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात विद्यार्थी व पालक मेळावा संपन्न झाला.याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,पालखेडचे भूमिपुत्र दानशूर व्यक्तिमत्व श्रावण हिरे, विनायक खैरे,स्कूल कमिटी सदस्य ज्ञानेश्वर जाधव,माजी मुख्याध्यापक दत्ताराम थेटे,पालखेड ग्रामपालिकेचे सदस्य योगेश होलगडे,राजेंद्र आहेर आदी होते.यावेळी दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख,यशस्वी वाटचाल, विद्यार्थ्यांची प्रगती याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. यानंतर पालकांनी अपेक्षा,पाल्याच्या गुणवत्ता वाढीसाठी करावयाचे प्रयत्न याबाबत चर्चा केली. याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके, मंगेश कागदे,संदीप आहेर,सुनंदा दुर्धवळे यांनी शंकानिरसन केले.यावेळी पालक शिक्षक संघ,शालेय व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली.शिक्षक

**न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड विद्यालयात मेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते वितरण**

पालक संघाच्या अध्यक्षपदी विजय आहेर,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सतीश थेटे यांची तसेच सर्व सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.याप्रसंगी नवनियुक्त पदाधिकारी व सदस्यांना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी इयत्ता दहावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांना दानशूर व्यक्तिमत्व श्रावण पुंजाजी हिरे यांनी विद्यालयात आणि केंद्रात प्रथम आलेली विद्यार्थिनी कु.भक्ती विक्रम छाजेड १५००१/- कु.सृष्टी उत्तम नरुडे १०००१/-. (ओपन,ओबीसी प्रथम )कु. रोहन ज्ञानेश्वर हिरे १०००१/-( नवबौद्ध प्रथम) कु.प्रियंका अरविंद पवार १०००१/-( एस. सी,एन. टी, एस. टी प्रथम)तसेच गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये मयूर आहेर,सुधीर सुरासे,प्रतिज्ञा थेटे,गौरी आहेर, यांनाही प्रत्येकी रोख रक्कम २००१/- रुपये देण्यात आले. तसेच कै. दिनकरराव शंकरराव खैरे यांच्या स्मरणार्थ कैलासराव आणि विनायकराव दिनकर खैरे यांचेकडून केंद्रात महाविद्यालयात प्रथम आलेली भक्ती विक्रम छाजेड १५०१/- द्वितीय सृष्टी सचिन नरुडे १००१/- तृतीय मयूर अनिल आहेर ५०१/-याप्रमाणे रोख रक्कम आणि पारितोषिक देवून सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांसह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार दत्तात्रय पगार यांनी केले.

# कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे : कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलमध्ये दिनांक २६ जुलै २०२५ रोजी कारगिल विजय दिवस अभिमानपूर्वक आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या हिंदी विभागामार्फत करण्यात आले होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तिपर सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे भारतीय शूरवीर सैनिकांच्या बलिदानाला अभिवादन केले.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मोहेकर महाविद्यालय, कळंब येथील हिंदी विभागप्रमुख प्रा. साकोळे सर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात कारगिल युद्धातील भारतीय सेनेच्या शौर्याची आठवण करून दिली आणि आजच्या विद्यार्थ्यांनी देशासाठी कर्तव्यबुद्धीने सज्ज राहावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे नवे प्राचार्य श्री. पवन कुलकर्णी सर यांनी भूषवले. त्यांनी आपल्या मनोगतातून देशभक्तीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये जागृत केली. संस्थेच्या संचालिका सौ. आशा नरहिरे मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कारगिल युद्ध या विषयावर प्रभावी भाषणं सादर केली. विविध गटांनी देशभक्तिपर गीते गायली, तसेच विद्यार्थ्यांच्या नृत्य सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमातून देशप्रेम, शिस्त, आणि समर्पणाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन हिंदी विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन आणि संपूर्ण नियोजन श्री. सचिन शिंदे सर यांनी अत्यंत सुरळीतपणे पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी सान्वी मांडवकर यांनी आभार प्रदर्शन करून सर्व मान्यवर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

हा कार्यक्रम उपस्थित सर्वांनी अत्यंत प्रेरणादायी आणि भावनिक अनुभूती देणारा ठरल्याची प्रतिक्रिया दिली. कॅनव्हास स्कूलने अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, जबाबदारी आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा व्रत घेतले आहे.

### नागपंचमीनिमित्त सापांबद्दल गैरसमज दूर करून जनजागृती


# निफाड वैनतेय विद्यामंदिरात ‘सापांच्या दुनियेची सफर’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

सापांची केवळ भीतीपोटी मोठ्या प्रमाणावर हत्या केली जाते. सापांबद्दल असलेले गैरसमज, अंधश्रद्धा दूर करण्यासाठी वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर निफाड शाळेतील शिक्षक गोरख सानप यांनी नागपंचमीचे औचित्य साधून मुलांना सापांच्या दुनियेची सफर घडवली.

सापांच्या विषारी बिनविषारी जाती, सापांचे अन्न, सर्पदंशाची लक्षणे व त्यावर करायचे प्रथमोपचार, वन्यजीव संरक्षक कायदा, सापाचे विष त्याचे प्रकार व उपयोग, जनसामान्यात असलेले गैरसमज व अंधश्रद्धा यावर सानप यांनी चित्रमय भित्तिपत्रिका तयार केल्या. या भित्तिपत्रिका प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. साप दिसल्यास कोणती खबरदारी घ्यायची, सर्पदंश झाल्यास प्रथमोपचार कसा करायचा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. ' सर्पमित्रांची मदत घेवू, सापाला जीवदान देवू' 'साप वाचवा पर्यावरण वाचवा' अशा घोषणांनी विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.




**निफाड : नागपंचमीनिमित्त सापांच्या दुनियेची सफर प्रदर्शनाला भेट देतांना वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील विद्यार्थी समवेत मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, गोरख सानप, किरण खैरनार, संजय जाधव.**

अन्नधान्याची नासाडी करणाऱ्या उंदीर, घुशींना खाऊन साप अन्नसाखळीतील एक महत्वाचा घटक मानला जातो. नागपंचमीच्या सणाला विद्यार्थ्यांच्या मनात सापांविषयी असलेले गैरसमज दुर करून सापांबद्दल जागरूकता निर्माण करणाऱ्या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, संस्थापक विश्वस्त अॅड ल.जि. उगांवकर, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, ड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, विस्तार अधिकारी लता भरसट, केंद्रप्रमुख अनिता आहिरे व पालकांनी कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी गोरख सानप, किरण खेरनार, संजय जाधव, व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

सापांबद्दल असलेले गैरसमज व अंधश्रद्धा अशा.

साप दूध पितो.

साप डूख धरतो.

नाग धनाचे रक्षण करतो.

मांडुळाच्या मदतीने गुप्तधन शोधता येते.

सापाला संगित आवडते, तो गारूड्याच्या बिनीवर डोलतो.

मंत्राने विष उतरते.

साप एका रूपातून दुसक्षवया रूपात जाऊ शकतो.

धामण साप गायीच्या पायाला विळखा घालून दूध पितो.

मंत्राने साप नियंत्रित करता येतो.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर ‘भारतरत्न’ द्यावा; खासदार प्रणिती शिंदे यांची केंद्र सरकारकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली / सोलापूर : भारतीय संविधानातील समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे मूर्त स्वरूप ठरलेले क्रांतिकारी लोकशाहीर, विचारवंत, साहित्यिक आणि समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर ‘भारतरत्न’ हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात यावा, अशी मागणी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. खासदार शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शहा यांना यासंदर्भात पत्र पाठवून हा विषय माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संबंधित समितीकडे मांडण्याचे आवाहन केले आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम होते. त्यांनी आपल्या शाहिरी, लेखन, लोकनाट्य आणि कथनशैलीद्वारे सामाजिक क्रांतीचा दीप पेटवला. ‘फकिरा’, ‘झुंड’, वारणेचा वाघ, ‘माझी मैना’ यासारख्या त्यांच्या साहित्य संपदा आजही शोषित, वंचित आणि श्रमिक वर्गासाठी प्रेरणादायी ठरतात.





खासदार प्रणिती शिंदे

अण्णाभाऊ साठे यांनी मोजकेच औपचारिक शिक्षण घेतले असतानाही ३५ कादंबऱ्या, १३ लोकनाट्य, ७ चित्रपटांच्या कथा, प्रवासवर्णन, कविता संग्रह, पोवाडे आणि अनेक शाहिरी रचना केली. त्यांच्या साहित्याचे २७ देशांमध्ये अनुवाद झाले असून विशेषतः रशियन ग्रंथालयांमध्ये त्यांच्या साहित्याला मानाचे स्थान आहे. तसेच अण्णाभाऊ साठे यांनी छत्रपती ‘शिवाजी महाराजांचे गड किल्ले’ या विषयावर पोवाडा सुद्धा रचला आहे. ते केवळ साहित्यिकच नव्हते, तर ते महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य चळवळीतही सक्रिय होते. त्यांनी श्रमिक आणि कष्टकरी समाजासाठी आपल्या लेखणीने न्यायाचा आवाज बुलंद केला असल्याचे यांनी पत्रातून अधोरेखित केले.

खासदार शिंदे म्हणाल्या की, अण्णाभाऊ साठे यांचे कार्य भारतीय संविधानाच्या मूल्यांशी सुसंगत आहे. त्यामुळे त्यांना मरणोत्तर भारतरत्न देणे हे केवळ योग्यच नव्हे, तर न्याय्यही ठरेल. महाराष्ट्रासह देशभरात त्यांच्या कार्याचे व विचारांचे महत्व आहे. केंद्र सरकारने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा. अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना मरणोत्तर ‘भारतरत्न’ पुरस्कार देण्याची ही मागणी महाराष्ट्रासाठी, विशेषतः मागासवर्गीय, श्रमिक, वंचित वर्गासाठी अभिमानास्पद ठरेल, असेही खासदार प्रणिती शिंदे यांनी नमूद केले आहे.

### आषाढी वारी २०२५ अंतर्गत पालख्या व वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी केलेल्या खर्चाची देयके आठ दिवसात दिली जाणार

# सर्व शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या परिश्रमामुळे आषाढी वारी यशस्वी झाली : पालकमंत्री जयकुमार गोरे

## सोलापूर, सातारा व पुणे जिल्ह्यातील आषाढी वारी नियोजनात असलेल्या सर्व शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/पंढरपूर:- आषाढ शुद्ध एकादशी ६ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मुख्य शासकीय महापूजा झाली. या वारीसाठी पंढरपूर येथे जवळपास २७ लाख भाविक उपस्थित होते. सर्व मानाच्या पालख्या दिंड्या व पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांसाठी तसेच पालखी मार्गावर सोलापूर पुणे व सातारा जिल्ह्यातील प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध करून दिलेल्या होत्या. तिन्ही जिल्ह्यातील प्रशासनाच्या सुयोग्य नियोजन व परिश्रमामुळे यावर्षीची आषाढी वारी खूप मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाली, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद सोलापूर यांच्या वतीने पंढरपूर येथे आषाढी वारी २०२५ आभार व कृतज्ञता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नटराजन यांच्यासह पुणे सातारा व सोलापूर जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आषाढी वारी २०२५ आभार व कृतज्ञता मेळाव्यासाठी पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती**






यावेळी पालकमंत्री गोरे म्हणाले की, मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर वारकरी भावी दिंड्या पालख्या त्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणावर सुविधा निर्माण करण्यात आलेल्या होत्या. तसेच वाखरी व ६५ एकर येथे तसेच मंदिर परिसर व संपूर्ण पंढरपूर शहरात प्रशासनाने वारकरी भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचणी येणार नाही यासाठी सर्व कामे वारी पूर्वीच करून घेतलेली होती. तसेच दर्शनासाठी विविध सुविधा निर्माण केल्यामुळे दर्शनाचा कालावधी सोळा-सतरा तासावरून पाच-सहा तासापर्यंत आला त्यामुळे भाविकांना मोठ्या प्रमाणावर समाधान मिळाले व हे सर्व यश हे प्रशासनाने केलेल्या सुयोग्य नियोजनाचे व घेतलेल्या परिश्रमाचे असल्याचे त्यांनी सांगून सर्वाधिकारी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. आषाढी वारी कालावधीत वारकरी पालख्या तसेच भाविकांना सुविधा देण्यासाठी प्रशासनाने केलेल्या कामांची देयके पुढील आठ दिवसात दिली जाणार आहेत. यापूर्वी मागील आषाढी वारी संपली तरी दे एके दिली जात नव्हती परंतु आपण यावर्षी त्वरित देयके देणार असल्याची माहिती पालकमंत्री श्री गोरे यांनी यावेळी दिली.

यावेळी आमदार समाधान आवताडे व माजी आमदार श्री परिचारक यांनी आषाढी वारी २०२५ मध्ये सर्व प्रशासनाने बजावलेल्या भूमिकेचे कौतुक केले व पुढील काळातही याच पद्धतीने वारीचे नियोजन होऊन वारकऱ्यांना उत्कृष्ट सुविधा उपलब्ध केल्या जातील अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी सातारा नटराजन तसेच सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी वारी कालावधीत केलेल्या कामकाजाची माहिती दिली. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनीही पोलीस विभागाने वारीत बजावलेली भूमिका यावेळी सांगितली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते साफसफाई कर्मचारी यांना प्राथमिक स्वरूपात वारी कालावधीत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. त्यानंतर ग्रामविकास विभागाचे मंत्रालयीन स्तरावरील अधिकारी यांनी तात्काळ निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचाही सत्कार पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात काही विभाग प्रमुखांच्या सत्कार व सन्मानचिन्ह पालकमंत्री यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

प्रारंभी पालकमंत्री गोरे व मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी आषाढी वारी २०२५ आभार व कृतज्ञता मेळावा या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

## सिंहगडचे नियतकालिका अद्विकचे कुलगुरूंच्या हस्ते प्रकाशन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

तालुका पंढरपूर येथील कोर्टी येथील एस. के. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिका अद्विक २०२४ चे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉक्टर प्रकाश महानवर व तारा पापा विद्यापीठ चिलीचे प्राध्यापक डॉक्टर अर्धे ग्लेव्हिस सोटो , झगा झिंग विद्यापीठ इजिप्तचे प्रा डॉक्टर एम ए तोफिक यांच्या हस्ते संपन्न झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर कैलास कारंडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून महाविद्यालयात नियमितपणे विविध उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या विचारांना व्यक्त करण्यासाठी अद्विक नियतकालिकात मायबोली प्रयास अभिमान इंग्रजी व कलाध्विक इत्यादी विभागात विद्यार्थ्यांनी वैचारिक लेखन केलेले आहे. या वार्षिक नियतकालिका पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची कुलगुरू डॉक्टर प्रकाश महानवर यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थित प्रकाशित करण्यात आली. या नियतकालिकासाठी डॉक्टर संपत देशमुख, यांनी प्रमुख संपादक डॉक्टर दीपक ग*** मोठे संपादक गीतांजली देशमुख ,प्रतिक कुलकर्णी, वैष्णवी पाटील ,श्वेता पाटील ,वैष्णवी माने, श्रावणी बुचके ,कीर्ती पुजारी, कोमल जाधव ,उमामा बेद्रेकर ,आणि शिरूर जोशी, यांनी विद्यार्थी संपादक म्हणून काम पाहिले.

या प्रकाशनेच्या सोहळ्यास उपप्राचार्य डॉक्टर स्वानंद कुलकर्णी , ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉक्टर समीर कटेकर , डॉक्टर चेतना पिसे, डॉक्टर भालचंद्र गोडबोले ,डॉक्टर श्याम कुलकर्णी, डॉक्टर श्री गणेश कदम, डॉक्टर अल्ताफ मुलानी ,डॉक्टर बाळासाहेब गांधारे डॉक्टर अतुल आराध्य डॉक्टर सोमनाथ कोळी डॉक्टर सुभाष पिंगळे डॉक्टर अनिल निकम ,डॉक्टर शिवशंकर कोंढुर, डॉक्टर यशवंत पवार, डॉक्टर सत्यवान जगदाळे ,आधी सह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

## भारत-पाक बॉर्डरच्या राजाचा पाद्यपूजन सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : मुंबई येथील भारतीय नौदलाच्या बेस शेजारी, कुर्ला एल.बी.एस. मार्गावरील श्री.सिद्धिविनायक गणेश चित्र शाळेत भारत-पाकच्या बॉर्डरच्या राजाची मूर्ती साकारण्यात येत आहे.

भारत-पाक पुंछ सीमेवर विराजमान होणाऱ्या या गणेशाची मूर्ती दरवर्षी मुंबईतून काश्मीरला नेली जाते. यंदाचे हे मूर्तीचे सोळावे वर्ष आहे. भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवरील पुंछ जिल्ह्यात विराजमान होणाऱ्या राजाचा पाद्यपूजन सोहळा रविवारी दि. २७ जुलै २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.



भारत-पाक बॉर्डरच्या राजाचा पाद्यपूजन सोहळा पार पडला त्यावेळी ईशरदिदी (मानवाधिकार कार्यकर्ता), छत्रपती आवटेदादा, मंगेश मस्तुद, प्रमोद चव्हाण, बाळू राऊत, अजित घगवे, विनीत पटेल, जगदीश बुछडा, अनुप सोनी, किरण भड, सुहेल तसेच प्रोग्रेसिव्ह नेशन एनजीओ चे कार्यकर्ते उपस्थित होते. भारत-पाक सीमेवर पुंछ येथील पुलस्त नदीच्या तटावर मानव अधिकार कार्यकर्त्या व प्राचीन शिव दुर्गा भैरव मंदीर ट्रस्ट उपाध्यक्षा ईशरदीदी तसेच समाजसेवक व शिवनेरी सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष छत्रपती आवटे व प्रोग्रेसिव्ह नेशन एनजीओ कार्यकर्ते यांच्या संयुक्त विद्यमाने या गणेशोत्सवाचे आयोजन केले जाते.

या उत्सवात विराजमान होणाऱ्या गणेशाला भारत-पाक बॉर्डरचा राजा म्हणून संबोधले जाते.भारतीय जवानांना देखील गणेशोत्सव साजरा करता यावा या उद्देशाने मुंबई ही आपली आर्थिक राजधानी आहे आणि मुंबई मध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात त्यामुळे मुंबईतून सर्वांचे प्रेम आशिर्वाद घेऊन मानव अधिकार कार्यकर्त्या व प्राचीन शिव दुर्गा भैरव मंदीर ट्रस्ट उपाध्यक्षा ईशरदीदी जम्मू आणि काश्मीर येथील पुंछ या ठिकाणी गणेशाची मूर्ती घेऊन जातात. जम्मू काश्मीर येथे भारतीय जवान मोठ्या हर्ष उल्हासात गणरायाचे स्वागत करतात व जम्मू आणि काश्मीर येथील पुंछ या ठिकाणी गणरायाला विराजमान करण्याचे हे अखंडीत सोळावे वर्ष आहे.

## कोकण रत्न पदवीसाठी नामांकन पाठविण्याचे स्वतंत्र कोकण राज्य अभियानतर्फे आवाहन

मुंबई/केतन भोज : स्वतंत्र कोकण राज्य अभियान अंतर्गत विविध श्रेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १० भगिनी आणि २५ कोकणी बांधवाना शनिवार १३ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघ, दुसरा मजला, महापालिका मार्ग, आझाद मैदान शेजारी मुंबई येथे दुपारी ४ ते ६ या वेळेत कोकण रत्न पदवी प्रदान करण्यात येणार आहे.यामध्ये पदवी प्राप्त भगिनींना सेमी पैठणी साडी ,गोल्ड प्लेटेड मेडल, आकर्षक फ्रेम मध्ये कोकण रत्न पदवी प्रमाणपत्र तर पुरुषांना कोकणरत्न पदवी प्रमाणपत्र,गोल्ड प्लेटेड मेडलप्रदान करण्यात येईल.

कोकण रत्न पदवीसाठी संजय कोकरे संस्थापक / अध्यक्ष ९२२४४४३११९, २) धनंजय कुवेसकर मुंबई अध्यक्ष ९८६९०७६६०२, ३) सुखदेव पवार संघटक ८०८२७६९ ०९१ यांच्या व्हाट्सअप नंबरवर आपले नामांकन पाठवावे असे आवाहन स्वतंत्र कोकण राज्य अभियानाचे संस्थापक / अध्यक्ष संजय कोकरे यांनी केले आहे. कोकण रत्न पदवीसाठी कुठल्याही प्रकारची फी आकारली जात नाही याची नोंद घेण्यात यावी.तरी इच्छुकांनी दिलेल्या व्हाट्सअप नंबरवर आपली सविस्तर माहिती पाठवावी असे आवाहन स्वतंत्र कोकण राज्य अभियानतर्फे करण्यात करण्यात आले आहे.

### वंचिताचा कैवारी माऊली हळणवर यांनी घडवून आणली ही भेट

## पंढरीतील तृतीयपंथीयांनी घेतली पालकमंत्र्यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : राहण्यासाठी घर नाही जागा नाही आम्ही बेवारस जीवन जगतोय म्हणत आज तृतीय पंथी लोकांनी पालकमंत्री महोदयांची भेट घेतली व आपल्या व्यथा मांडल्या.

आज सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार भाऊ गोरे हे पंढरपूर येथे आले असता पंढरपूर शहरातील तृतीयपंथी बांधवांनी वंचित शोषितांचे कैवारी माऊली भाऊ हळणवर यांना सोबत घेऊन पालकमंत्री महोदयांना निवेदन दिले की पंढरपूर शहरात तृतीयपंथीची संख्या २५ ते ३० असून हे बेघर आहेत. घरातील लोक दुर्लक्ष करतात घरी राहू देत नाहीत घरात त्यांची हेळसांड होत असते ते आपल्या





गुरुच्या घरी राहत असून दहा बाय दहाच्या खोलीमध्ये सात ते आठ लोक राहत असतात रस्त्यावरती व बाजारात मागून आपला पोटापाण्याचा प्रश्न सोडवत असतात अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत त्यांनी मागणी केली केली आम्हाला रेशन कार्ड मिळावे आधार कार्ड मिळावं व सन्मानानं जगता यावं याकरता पंढरपूर शहरांमध्ये राहण्यासाठी जागा व शासनाकडून घरकुल मिळावे अशी मागणी त्यांनी केली.

गोरगरिबांचा विस्थापितांचा प्रश्न तातडीने सोडवणारा पालकमंत्री आपली ख्याती संपूर्ण महाराष्ट्रभर असून अनेक गोरगरिबांना आपण मदत केलेली आहे आम्हाला ही मदत करा व माणसा सारखे जगण्याची संधी द्या अशी विनंती केली त्यावेळी ना. जयकुमार गोरे भाऊनी आस्थेने या तृतीयपंथी बांधवांची चौकशी केली सर्व ऐकून घेतले नक्कीच आपल्या प्रश्नावर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले यावेळी माऊली भाऊ हळणवर यांचे सह परसु पवार सिमा माने, विष्णवी वाघमारे ,वैशाली शिरसट ,नगमा गायकवाड ,सोनाली साबळे, निता माने, आयशा माने हे उपस्थित होते.

## आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सप ग्रुप मार्फत शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री येथे १५० किलो लाडूचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : संपूर्ण महाराष्ट्रातील शिवसैनिक सदस्य असलेला आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सप ग्रुप मार्फत ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण करत २६ सामाजिक उपक्रम राबविले गेले आहेत.तसेच २७ वा उपक्रम दर वर्षाप्रमाणे शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या ६५ व्या वाढदिवसा निमित्त महाराष्ट्रातून येणाऱ्या तमाम शिवसैनिकांसाठी मातोश्री बंगला,बांद्रा येथे १५० किलो लाडू वाटप करण्यात आले.



या लाडू वाटप स्टॉलवर आमदार,खासदार,नगरसेवक यांनी भेट देऊन त्यांच्या हस्ते वाटप करून त्यांनी देखील आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या ग्रुपची तोंडभरून कौतुक केले. या ग्रुप मधील कोल्हापूर, सोलापूर रत्नागिरी, भंडारा, नाशिक या विविध भागातील या ग्रुपचे सदस्य यांनी सकाळ पासून मेहनत घेऊन हा कार्यक्रम पार करण्यास सहकार्य केले.या ग्रुपचे संस्थापक,संचालक संतोष पाटील,संचालक महेंद्र गुरव, अध्यक्ष सुरेश वाडकर तसेच भालचंद्र उकिर्डे, लवेश म्हात्रे, रंजीत नरवणकर, लिलाधर भोईर, दिलीप गावडे, जितेंद्र पाभरेकर, सुजाता धारगळकर, वासंती गोताड, अनिल कांबळे, संपदा धोंगडे, सोनिया पाटील, संदीप गुरव, प्रवीण कोरपे, विलास चव्हाण, संतोष झोल, खंडू खोचरे, ईश्वर गुळवी, जयाभाऊ दवंडे, बबन शेळके, ललित कुमार मुथा, सागर पाटील, राकेश देवकुळे, आबा मोहिते, लहू साळुंखे, शांताराम नाईक, अशोक कोळंबकर, अशोक देशमुख, संजय डोर्लेकर, सुनील काप, दिनेश पाटील, संजय पवार, रज्जाक शेख, नामदेव रिंगे, राजेश तिवारी इत्यादी ग्रुप मधील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.